दैनिक
महाराष्ट्र
सूर्योदय
मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे

January 10, 2025 | Page No:4
epaper.suryodaylive.in
Powered By DigitalEditions.In - 9504040304

# योगेश्वरी च्या सायबर वॉरियर्सचा गुणगौरव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियाना अंतर्गत महाविद्यालयीन पातळीवर १२ विद्यार्थ्यांना विविध पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. क्विक हिल फाऊंडेशन च्या वतीने कमवा व शिका या योजनेअंतर्गत हे अभियान राबविण्यात येते. सायबर सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी व्यापक प्रमाणावर हे अभियान विविध टप्प्यावर नियोजनबद्ध रीतीने पूर्णत्वास नेण्यासाठी एकूण २२ विद्यार्थ्यांची महाविद्यालयातून निवड करण्यात आली होती. ह्या विद्यार्थ्यांनी अंबाजोगाई व परिसरातील शाळा, महाविद्यालय, विविध आस्थापना ,एस टी




महामंडळ, आठवडी बाजार, बँका आदी ठिकाणी जाऊन लोकांमध्ये सायबर सुरक्षे संबंधी जनजागृती केली. याच कार्याची दखल घेऊन पुढील १२ विद्यार्थ्यांना ०३ वेगवेगळ्या श्रेणीतील विजेते व उपविजेते या पुरस्काराने पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बेस्ट प्रोसेस कंप्लायन्स श्रेणीतील विजेत्या कु. साक्षी कुसुमकर व तृप्ती वडगावकर, उपविजेत्या कु. निकिता काळे व कु. जिजाऊ खोटे. हायेस्ट ऑफलाइन आउटरिच या श्रेणीतील विजेत्या कु. श्रद्धा राऊत व कु. गायत्री फुटाणे, उपविजेते चि. मकरंद कुलकर्णी व चि. अभिनय वाघमारे तसेच हायेस्ट ऑनलाइन आउटरिच या श्रेणीतील विजेते चि. शुभम उदारे चि. संजय बोनगे उपविजेत्या कु. अंजली गव्हाणे व कु. गायत्री बासटवार यांना योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव ॅड. कमलाकरराव चौसाळकर, संचालक श्री रमण सोनवलकर, प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानिटकर, उपप्राचार्य डॉ. आर. व्हि. कुलकर्णी यांनी सन्मानित केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना ड. कमलाकर चौसाळकर यांनी सायबर सुरक्षा व दक्षता महत्त्वाची आहे हे सांगून विद्यार्थी करत असणाऱ्या कामाचे कौतुक केले. या अभियानाचे शिक्षक समन्वयक म्हणून संगणक विभाग प्रमुख डॉ. आर. जी. जोशी व प्रा. ऋतुजा रामदासी यांनी काम पाहिले. याप्रसंगी संगणक विभागाचे प्राध्यापक डॉ. महेंद्र आचार्य, डॉ. उदय थेटे, प्रा. संजय कुलकर्णी, डॉ. विनोद गंगणे यांनी पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.